Website: www.word-pdf-convert.com



**के.एम.कामुने, अपर जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचे न्यायालय**

अ.प्र.क्र. आरटीएस-५९/उकळी/१७/२००९-१०

१. सौ. चंद्रभागाबाई प्रल्हाद धोटे,
   रा. परतापूर. ता. मेहकर जि. बुलडाणा
२. सौ.विजया बाळकृष्ण बोरकर
   रा. मेहकर ता. मेहकर जि. बुलडाणा - - अपिलार्थी

**विरुध्द**

१. श्री डिगांबर विठ्ठल जाधव,
२. श्री ज्ञानदेव विठ्ठल जाधव,
३. श्री कडूबा रामचंद्र धनवट
   सर्व रा. परतापूर ता. मेहकर जि. बुलडाणा - - प्रतिवादी

**आदेश**

( पारित दिनांक २८ ऑगस्ट, २०१० )

मौजे उकळी ता. मेहकर जि. बुलडाणा येथील जुना सर्व्हे नं. ६८/२ ब गट नं.३३५ मधील १.३८ हे. जमीन दस्त क्र. २२१६ दिनांक १४.६.०२ अन्वये लक्ष्मीबाई नामदेव बुकतारे यांचेकडून खरदी हक्काने अपिलार्थी यांनी विकत घेतली. परंतु ०.८५ हेक्टर जमीनीची नोंद झाल्याने तहसिलदार मेहकर हयांनी प्र.क्र.आरटीएस.५९/उकळी/३४/२००८-०९ मधील आदेश दिनांक २७/०२/२००९ अन्वये ०.८५ ऐवजी १.३८ हेक्टर जमीनीच्या नोंदीची दुरुस्ती करण्याबाबत आदेशीत केले आहे. हया आदेशाविरुध्द प्रतिवादी यांनी उपविभागीय अधिकारी मेहकर यांचेकडे अपिल दाखल केले असता त्यांनी रा.प्र.क्र.आरटीएस-५९/उकळी/६०/२००८-०९ दिनांक १८/११/२००९ च्या आदेशान्वये अपिल मंजुर करुन तहसिलदारांचा दिनांक २७/०२/२००९ चा आदेश रद्द ठरविला आहे. हया आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थी यांनी सदर अपिल दाखल केलेले आहे.

प्रकरण पंजीबध्द करण्यात येऊन संबंधीतांना नोटीस काढण्यात आल्या आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांचे वकिलामार्फत लेखी युक्तीवाद दाखल केला. त्यात त्यांनी प्रामुख्याने नमूद केले आहे की, सदर जमिनीचे मुळ क्षेत्रफळ ६ एकर ३२ गुंठे जमीन त्यांनी वामन दिक्षीत यांना विकली. वामन दिक्षीत यांनी दगडू गुणाजी धनवट यास दिनांक १२.५.१९५८ रोजी ही ३ एकर १६ गुंठे जमीन विकली. उर्वरित ३ एकर १६ गुंठे जमीन लक्ष्मीबाई बुकवार यांनी घेतली व त्यांच्याकडून अपिलार्थी यांनी दिनांक १४.६.२००२ रोजी पंजीबध्द दस्ताने जमीन विकत घेतली आहे. दगडू गुणाजी धनवट हयांच्या वारसांनी ३ एकर १६ गुंठे जमिनी पैकी ४६ गुंठे जमीन रामचंद्र जाधव यांना विकली. त्यामुळे त्यांचेकडे २ एकर १६ गुंठे जमीन राहिली. त्यामुळे तहसिलदार मेहकर यांनी कायदेशिर व बरोबर आदेश पारीत केला आहे. सबब त्यांचा आदेश करण्यात यावा व उपविभागीय अधिकारी मेहकर यांनी पारीत केलेला आदेश रद्दबादल ठरवून प्रस्तुत अपिल मंजुर करण्यात यावे.

प्रतिवादी हयांनी त्यांचे वकिलामार्फत लेखी युक्तीवाद दाखल केला. त्यामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, अपिलार्थी यांनी खरेदी खताप्रमाणे लक्ष्मीबाई एकतार हयांचेकडून १.३८ हे.जमीन विकत घेतल्याचे नमूद असले तरी लक्ष्मीबाई एकतार हयांचेकडे केवळ ०.८५ हे. ऐवढीच जमीन होती. कनिष्ठ कोर्टाकडे १९७७-७८ चा जो सातबारा दाखल केला त्यात ०.८५ हे. एवढेच क्षेत्र दिसते. त्यामुळे अपिलार्थीची मागणी बेकायदशिर व चुकीची असल्याचे सिध्द होते. उपविभागीय अधिकारी मेहकर यांनी दोन्ही पक्षांना समान संधी देऊन कायदेशिर बाबींचा पूर्ण अल्यास करुन

Website: www.word-pdf-convert.com

आदेश पारीत केला आहे. त्यामुळे सदर आदेश कायम ठेवण्यात यावा व अपिलार्थीचे अपिल खारीज करण्यात यावे.

उभय पक्षाचा लेखी युक्तीवाद, कनिष्ठ कोर्टाची प्रकरणे व पारीत केलेले आदेश हयाचा काळजीपूर्वक अभ्यास केला. जमिनीच्या मुळे क्षेत्रापैकी (६ एकर १६ गुंठे) प्रतिवादी हयांचे पूर्वजांनी ३ एकर १६ गुंठे जमीन विकत घेतली होती व उर्वरित जमीन अपिलार्थी यांनी विकत घेतली. अपिलार्थी यांनी सन २००२ मध्ये लक्ष्मीबाई बुकतारे हयांचेकडून जमीन विकत घेतली व तसा फेरफार क्रमांक ४१५(अ) हा दिनांक ०१.०१.२००३ रोजी रुजु झाला आहे. त्यामध्ये ०.८५ हेक्टर जमिनीची नोंद आहे. तेंव्हापासून हयाबाबत आतापावेतो त्यांनी कोणताही आक्षेप घेतलेला नाही हा निष्कर्ष उपविभागीय अधिकारी मेहकर यांनी आदेश पारीत करतांना काढला आहे. सदर निष्कर्षाशी मी सहमत आहे. सबब प्रकरणात खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

अपिलार्थीचा अपिल अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. उपविभागीय अधिकारी, मेहकर हयांचा राजस्व प्रकरण आरटीएस-५९/उकळी/६०/२००८-०९ मध्ये दिनांक १८/११/२००९ रोजी पारीत केलेला आदेश कायम करण्यात येत आहे.

खर्चाबाबत आदेश नाहीत.

अपर जिल्हाधिकारी यांचे कार्यालय
सत्यमेव जयते
बुलडाणा

(के.एम.कामुर्ती)
अपर जिल्हाधिकारी, बुलडाणा

प्रतिलिपी

१. उपविभागीय अधिकारी, मेहकर यांना त्यांच्या फाईलवरील राजस्व प्रकरण आरटीएस-५९/उकळी/६०/२००८-०९ सह माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित.
२. तहसिलदार मेहकर यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.

अपर जिल्हाधिकारी, बुलडाणा